
पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

मार्च २०२१ ▼ किंमत ₹ २५

PUNE, वर्ष २० ▼ अंक १२ ▼ पृष्ठे-१६






पाठशाला भीतर और बाहर

शिक्षणाप्रति आस्था असणाऱ्या व्यक्ती, संस्थांना ‘शिक्षण’ ह्या विषयावर वैचारिक आदानप्रदान करण्यासाठी अझीम प्रेमजी विद्यापीठाने ‘पाठशाला भीतर और बाहर’ हा मंच उपलब्ध करून दिला आहे. ह्या हिंदी द्वैवार्षिकात शिक्षणक्षेत्रात कार्यरत व्यक्ती आपले अनुभव, विचार व्यक्त करतात. एकमेकांच्या अनुभवाचा फायदा होऊन कामाला अधिक खोली यावी, काम अधिकाधिक अर्थपूर्ण होण्यास मदत मिळावी, हा ह्यामागचा उद्देश.

ह्या अंकांमध्ये शालेय शिक्षण, विषेशतः शिक्षणाची सुरुवातीची वर्षे, शिक्षक-प्रशिक्षणाचे विविध पैलू, धोरणात्मक आणि सद्यकाळाशी सुसंगत विषयांवरील गुणवत्तापूर्ण लेख वाचायला मिळतात. वर्गात येणारे अनुभव-अडचणी, मुलांना भाषा, विज्ञान, गणित, समाजशास्त्र आदि विषय शिकवण्याच्या अभिनव पद्धती शिक्षकांनी एकमेकांना सांगून इतरांना त्याचा फायदा करून द्यावा, अशी भूमिका आहे.

शिक्षण आणि त्याच्या विविध पैलूंशी निगडित विषयांवरील उत्तमोत्तम पुस्तके, चित्रपटपरीक्षणे, शिक्षकांच्या मुलाखतींनाही इथे स्थान आहे.



प्रकाशित साहित्याचा उपयोग शिक्षक, शिक्षक-प्रशिक्षक, विषयतज्ज्ञ, कोणीही शिक्षणकर्मी व्यक्ती किंवा संस्थांनी करावा अशी अपेक्षा असते. कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रांत ह्यातील साहित्याचा उपयोग करता येतो.

आजवर ‘पाठशाला’ चे ६ अंक प्रकाशित झाले असून शिक्षण आणि त्याचे व्यापक पैलू दर्शवणारे १०० हून जास्त लेख प्रकाशित झाले आहेत. हे अंक अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या टीचर ऑफ इंडिया पोर्टल, केआरसीवर उपलब्ध आहेत.

https://azimpremjifoundation.org/foundation-publication

pathshala@apu.edu.in वर ‘पाठशाला’बद्दल अधिक जाणून घेता येईल.

मुखपृष्ठाविषयी...

रमाकांत धनोकरांच्या भावचित्र-प्रदर्शनाबाबत आपण मागील महिन्याच्या अंकात वाचले. हे प्रदर्शन १४, १५ व १६ मार्च २०२१ ला बालगंधर्व रंगमंदिरात आपल्याला बघता येईल. त्यातीलच हे एक भावचित्र...

या अंकात

पा ल क नी ती
पालकत्वाला वाहिलेले मासिक

वार्षिक वर्गणी
₹ ३००
(जोड अंकासहित)
वर्गणीचा चेक / ड्राफ्ट
‘पालकनीती परिवार’
या नावाने काढावा.

संपर्क :
पालकनीती परिवार,
अमृता क्लिनिक,
संभाजीपूल कोपरा,
कर्वे रस्ता, पुणे ४११००४
फोन : ८०७०१५७२६
९८३४४१७५८३ (अनघा)
९८२२००१४७७ (संजीवनी)
palakneeti@gmail.com

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष २० - अंक १२
मार्च २०२१

संपादकीय

जग समतावादी व्हावं ते फक्त ८ मार्चपुरतं नाही, तर सतत आणि कायमचं. या संदर्भात समाज, राष्ट्र आणि विश्व म्हणून गेल्या काही शतकांत आपण निश्चितच काही प्रगती केली आहे. अर्थात, आणखी बरीच मजल मारायची आहे, याची जाणीव या निमित्तानं सर्वांनाच व्हावी हा या साजरीकरणामागचा हेतू असतो. या प्रगतीबद्दल कौतुक आणि प्रोत्साहन वगैरे गृहीत आहे, पण आता हे सगळं बास.

केवळ घरगुती हिंसाचाराचा मुद्दा घेतला तर जगभरातल्या १९५ देशांपैकी केवळ ११२ देशांमध्ये घरगुती हिंसाचारविरोधी कायदा अस्तित्वात आहे. कोविड-१९ च्या साथीमुळे स्त्री-समतेसाठी चाललेल्या जगभरच्या प्रयत्नांना अनेक अर्थांनी खीळ बसली आहे, याबद्दल याच अंकात इतरत्र एक खास लेख आहेच. या काळात जागतिक पातळीवर प्रत्येक तीनमधील एका स्त्री किंवा मुलीला शारीरिक किंवा लैंगिक हिंसेला तोंड द्यावं लागलं. 'गर्ल्स नॉट ब्राईड्स मेंबर ऑर्गनायझेशन' संस्थेच्या अहवालानुसार ह्या काळात टाळेबंदीमुळे आणि शाळा बंद राहिल्यामुळे जगभरातल्या ७४ कोटींपेक्षा जास्त मुली शिक्षण-प्रक्रियेपासून दूर राहिल्या. त्यातल्या सुमारे एक कोटी मुली परत शाळेशी जोडल्या गेल्याच नाहीत.

कोविड-१९ ने हातपाय पसरल्यापासून संपूर्ण जगभरातून कामगारांनी २.७ लाख कोटी रुपयांचा रोजगार गमावला आहे, त्याचवेळी ह्या काळात जगातल्या अब्जाधीशांच्या संपत्तीत सुमारे तेवढीच म्हणजे २.८६ लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. हे सांगायचं कारण एवढंच, की जेव्हा कुणाचा तरी पैसा जातो तेव्हा कुणाला तरी तो मिळतो. ह्या परिस्थितीची आपल्याला इतकी सवय झालेली असते, की त्यामागचे धागेदोरे आपल्या मनात येतच नाहीत, इतके आपण त्याला सरावलो किंवा निर्ढावलेलो आहोत.

आपल्याबाबत कधी कुठे भेदभाव झाला आहे की नाही असा विचार आपण केला, तर बहुतेक लोक होकारार्थी उत्तर देतील. कुठल्यातरी भेदभावाला बळी पडत असतानाच आपण कळत-नकळत, जाणता-अजाणता इतरांवरील अन्यायालाही मूक पाठिंबा देत असतो. उदाहरणार्थ, स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी व्यक्ती तृतीयपंथी व्यक्तीबाबत असंवेदनशील असते, किंवा जातपात- वंशाबाबत तिच्या धारणा संकुचित असू शकतात किंवा मग भाषा, पेहराव, रंगरूप ह्याबद्दल अगदी सूक्ष्मस्तरावर असणाऱ्या नापसंतीतून तिच्याकडून नकळत काही लोकांची उपेक्षा होऊ शकते. या उपेक्षेमागे आपल्या मनात असणारी भीती, असुरक्षितता, ओढ, स्व-प्रतिमा, आत्मप्रतिष्ठा, इच्छा-आकांक्षा, सामाजिक संकेत, जाणिवांचा अभाव अशा अनेक कारणांचा अंतर्भाव असतो.

भेदभाव करणाऱ्यांनी बदलावं हे खरंच; पण आपण चुकतो आहोत हे त्यांच्या लक्षात येणं जरा अवघडच असतं. भेदभाव झालेल्यांकडे क्षमता आणि ऊर्मी असेल तरच ते विरोध तरी करतात; अनेकदा त्यांचंही मनपरिवर्तन इतकं झालेलं असतं, की त्यांना त्या वेदनेचीही जाणीव नसते. मात्र बघ्यांनी नुसतं बघेपण सोडून धक्का द्यायची आज गरजच आहे. खरं तर, आपल्या मानसिकतेतून उद्‌भवणाऱ्या अशा समस्यांवर मात करण्यासाठी एकीकडे डोळसपणे प्रयत्न सुरू ठेवून त्याचबरोबर आपल्यासमोर आ वासून उभ्या असलेल्या इतर प्रश्नांकडेही पाहायला हवं आहे. समुद्राच्या पाण्याची वाढणारी उंची, वाढणाऱ्या तापमानात वितळणाऱ्या हिमनद्या - हिमकड्यांनी मांडलेला आपल्या उगवत्या पिढ्यांचा भविष्यभेद आपल्याला दिसतो आहे ना? आंदोलनं करणाऱ्यांना आंदोलन-जीवी वगैरे शिव्यागाळी करणाऱ्यांनी किंवा दिशा रवीसारख्या पोरांना देशद्रोही ठरवणाऱ्यांनी आपल्या समोरच्या खऱ्या प्रश्नांकडे पाहायला हवं आहे.

आपल्या रोजी आयुष्यात तर प्रश्न -प्रश्न -प्रश्न म्हणावं अशी स्थिती आहे. कोविड अजून म्हणावा तसा हाती आलेला नाही. त्याची लस देण्याच्या प्रयत्नात 'दो गज की दूरी' या कल्पनेचं भरीत किंवा फतफतं झालेलं आपल्या अनुभवाला येतं आहे. कोविडनं पुन्हा उचल खाल्लीय की काय अशी शंका येते आहेच; निदान भेदभाव, असमता वगैरे प्रश्न तरी आपण आता निर्धारानं सोडवायला हवेत आणि इतर प्रश्नांकडे वळायला हवेय, हीच वेळ आहे.

'पालकनीती' हे मासिक मालक, पालकनीती परिवाराकरिता प्रकाशक व मुद्रक डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी जय ॲड्व्हर्टायझिंग, सी-१०२, सुनिता अपार्टमेंट, कसबा पेठ, पुणे - ४११०११ येथे छापून अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वेरस्ता, पुणे - ४११००४ येथून प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. संजीवनी कुलकर्णी

'PALAKNEETI' monthly is owned by Palakneeti Pariwar, Printed and Published by Dr. Sanjeevani Kulkarni, Printed at Jay Advertising, C – 102, Sunita Apartment, Kasba Peth, Pune – 411011 & Published at Amrita Clinic, Sambhaji Bridge Corner, near Panchaleshwar Mandir, Karve Road, Pune – 411004.
Editor – Dr. Sanjeevani Kulkarni

मूल नावाचं सुंदर कोडं

संजीवनी कुलकर्णी

शोभाताई भागवत ह्यांना २०२० सालचा ‘मालतीबाई दांडेकर पुरस्कार’ पालकनीतीच्या संपादक डॉ. संजीवनी कुलकर्णी ह्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याबद्दल आपण मागील महिन्याच्या अंकात वाचले. पुरस्कार सोहळ्यात बोलताना डॉ. संजीवनी कुलकर्णी ह्यांनी आपल्या मनोगताला ‘मूल नावाचं सुंदर कोडं’ ह्या शोभाताईंच्याच पुस्तकाचे नाव दिले. या अंकात वाचू त्यांचे हे मनोगत…

कुठलंही मूल सुंदर कोडं तर असतंच; पण त्या सुंदरतेचा आपल्याला अंदाज येण्याआधी म्हणजे बालकाच्या जन्माआधीही आपल्याला एका कोड्याचं उत्तर शोधायचं असतं. लग्नानंतर मूल व्हायला पाहिजे अशी परंपरा आहे. त्यामुळे मूल जन्माला घालायचंच असं नवपरिणीत जोडप्यालाही वाटतं. समजून किंवा न समजताही, मूल जन्माला घालू असा निर्णय जोडप्यानं घेतलेला असतो. त्या निर्णयाचा अर्थ त्यांना समजलेला असतोच असं नाही. आपण असा निर्णय का घेतला आहे हा प्रश्न शक्यतो मूल होण्यापूर्वी; पण निदान मूल तान्हं असतानाच, प्रत्येक जोडप्यानं स्वतःला विचारला पाहिजे.

मूल होण्याचा निर्णय घेणं ही साधी बाब नाही. मूल जन्माला घालण्यापूर्वी बराच विचार करावा लागतो. मानववंश टिकावा म्हणून आजच्या काळात, ७०० कोटींच्या या जगात, आपण मूल जन्माला घालत नाही. मूल जन्माला घातलं, की आपल्या जीवनाला अर्थ येतो, अशी एक कल्पना आहे. पण मूल नुसतं जन्माला घालून पुरत नाही, त्याचं संगोपनही करावं लागतं. आजच्या धकाधकीच्या जीवनात मूल वाढवणं ही एक तारेवरची कसरत झालेली आहे. लग्न झालेल्या जोडप्याला एकमेकांशी प्रेमानं जुळवून घ्यायला काही वेळ लागतो. आपल्या करीयरचा विचार असतो. मूल होण्यात बाईच्या आयुष्याचा काही काळ जाणार असतो. पैशांची सोय तर व्हावी लागतेच. समजा पैशांचा प्रश्न बाजूला ठेवला, तरी हा निर्णय फार विचारपूर्वक घ्यायला हवा. मी हे आवर्जून सांगते आहे कारण आजूबाजूचे लोक ‘लग्नानंतर बाईला दिवस जावेत’ असा आग्रह करत असतात. पण आपल्याला ते चालणार आहे ना, असा विचार जोडप्यातील दोघांनीही करायला हवा.

मूल जन्माला घालूच नये असं मला अजिबात म्हणायचं नाही. मूल हा आनंद असतो. मूल वाढताना पाहणं यासारखी मजा दुसरी नाही. दु:ख सोसायची, कष्ट साहायची ताकद वाढवणारं, घरात मूल असण्याजोगं दुसरं औषध नाही. घरादारात आपल्या नुसत्या अस्तित्वानं आनंद पसरवणारी लहान मुलासारखी दुसरी गोष्ट नाही. पण आपल्या आनंदासाठी एका माणसाला या जगात आयुष्य जगायला लावायच्याआधी जरा थांबावं. मूल कशासाठी हवं? तर या प्रश्नाचं माझं उत्तर - मूल मुलासाठीच हवं. मूल झाल्यावर आपल्या आयुष्यात खूप तडजोडी कराव्या लागतात. पूर्वी या तडजोडी फक्त बाईला कराव्या लागत, आता तसं होत नाही. आणि ते बरोबरच आहे; पण निसर्गाचं ते अतिशय सुंदर कौतुक आपल्या घरात उमलावं असं वाटत असेल, तर त्याआधी आपण त्यासाठी तयार आहोत का हे तपासून पाहावं.

आपलं स्वत:चं मूल ही काही आयुष्यातली अटळ किंवा अपरिहार्य बाब नाही. ते कुठल्याही प्रतिष्ठेचं गमकही नाही. मूल नुसतं जन्माला घालून पुरत नाही, तर ते नीट वाढावं यासाठी आपल्याला सदैव दक्ष राहावं लागतं. मुलाला सर्वत्र निर्भयपणे वावरता यायला हवं. त्याच्या मनाला घरातही भीतीचा वारा लागता नये. मुलांना निरपेक्ष प्रेम, मोकळी जागा, श्वास घ्यायला स्वच्छ हवा, आणि पोट भरून पोषक अन्न, उत्तम बालसाहित्य, दर्जेदार शिक्षण, वयानुसार मनाशरीरात होणाऱ्या बदलांचं भान… मग पुढे जाऊन खेळायला मैदान, सवंगडी, वाचायला चांगली पुस्तकं मिळायला हवीत, हा त्यांचा हक्क आहे. आणि ह्या हक्काबदल्यात, अधिकारांबदल्यात मूल त्याच्या अस्तित्वानं आपल्याला मिळत असलेल्या आनंदाशिवाय बाकी काहीही देऊ लागत नाही.

मुलांचं मन जाणून घेता येणं ही, पालकत्व स्वीकारलं नसेल तरीही; पण स्वीकारलं असेल तर मात्र, अगदी अत्यावश्यक गोष्ट आहे. मुलांचं मन जाणून घ्यायची वाट मुलांशी बोलण्यातून येते. म्हटलं तर साधी गोष्ट; पण काही लोकांना, विशेषत: पुरुषांना, ‘मुलांशी काय बोलायचं?’ असं वाटतं. घर चालवताना त्यातले निर्णय फार क्वचित मुलांसमवेत घेतले जातात. मुलांचा विचार त्यात केलेला नसतो असं नाही, केलेला असतो; पण ७-८ वर्षांपुढच्या मुलांनादेखील आपण निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेत नाही. घरात एखादी मोठी

गोष्ट विकत घ्यायची असली, तरी तो निर्णय मुलांसोबत घ्यायला हवा. 'मुलांशी बोलणं' याचा अर्थ काही लोक मुलं बोलतात ते हू हू करून ऐकून घ्यायचं, फारसं लक्ष असेल नसेल तरी चालेल असं मानतात. काही पालक मुलांशी बोलणं याचा अर्थ उपदेश करणं असा मानतात. काही लोक मुलांचा अपमान अगदी सहजपणे करतात. 'तू गप्प बैस', 'मोठ्यांच्यात बोलू नकोस, आत जा', 'मोठे लोक बोलत असताना विचारल्याशिवाय तिथे यायचं नाही', असं म्हणतात. त्यात मुलांचा अपमान होतोय याची जाणीवही मोठ्यांना नसते. बाहेरच्या जगातही मुलांचा अपमान होता नये. शाळेत किंवा इतर ठिकाणी असं होऊ शकतं; पण निदान घर ही तरी मुलांना आधाराची जागा असली पाहिजे. मुलांचा घरात अपमान होण्याचे परिणाम अनेक आहेत; अगदी मूल घर सोडून जाणं किंवा आत्महत्या करणं इथपर्यंत. पण एक परिणाम तर अगदी नक्की होतो - मूल आपल्याशी कामाशिवाय बोलायचं बंद होतं. त्याच्या मनात आपल्याबद्दल राग धुमसू लागतो. हा परिणाम अनेकदा पालकांना कळतही नाही. ते तसेच वागत राहतात. मुलांच्या मनात काय चाललंय ते पालकांना अजिबात समजत नाही. कारण मुळामध्ये आपल्या मनातलं पालकही कधी मुलांशी बोलत नाहीत.

अगदी पहिले काही महिने, फारतर एक दीड वर्षं संपलं, की मुलासाठी वेळ देणं नुसतं कामामुळे अशक्यच नाही, तर अनेकांना कंटाळवाणं, नकोसं वाटू लागतं. एकदा शाळेत घातलं, की मनानं पालक मुलांच्या विकासाची जबाबदारी शाळेची मानू लागतात. मुलाला बहुपदरी, तर्कपूर्ण विचार करता येणं ही अपेक्षा शाळा अनेकदा पूर्ण करत नाहीत आणि पालकांचा मुलांशी संवाद हा खायला देणं, अभ्यास झाला का विचारणं, काही फुटलं-हरवलं तर रागवणं इतपतच व्हायला लागतो. याच सुमाराला मूल आपल्यापासून दूर जाण्याची सुरुवात होते.

एक वेगळा मुद्दा मला आपल्याला सांगायचाय. मुलांच्या बालजीवनात एकवेळ इतर काहीही चालेल पण 'हे नको' असा एक विषय आहे तो बालकावर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराचा. बालवयात कुठल्या ना कुठल्या लैंगिक अत्याचाराचा त्रास भोगावा लागलेल्या बालकांचं भारतातलं प्रमाण ५३% आहे. भारतातलं प्रमाण जगात सर्वात जास्त आहे. यात ७५% ठिकाणी अत्याचारी व्यक्ती मुलाच्या-मुलीच्या परिचयातली असते. काही ठिकाणी तर ती व्यक्ती वडील, काका, मामा, आजोबाही असू शकते. प्रयास संस्थेत आम्ही एक अभ्यास केला होता, त्यात तरुणांशी बोललो होतो. त्यात अनेकांनी आम्हाला त्यांच्यावर लहानपणी झालेल्या लैंगिक अत्याचारांबद्दल सांगितलं. आणि अनेकजण म्हणाले, की आम्ही हे आजतागायत कोणाशीही बोललेलो नाही. कोणाशीतरी बोलल्यानंदेखील आम्हाला थोडं बरं वाटतंय. इतकं वाईट वाटलं मला हे ऐकून. आपल्याशी बोलायचादेखील आत्मविश्वास पालकांनी या मुलांना दिलेला नव्हता. त्यांची बाजू खरी मानून अत्याचारी माणसाला पकडणं, त्याचं चुकलंय ह्याची जाणीव करून देणं दूर राहिलं. आता पॉक्सो नावाचा कायदा आहे. तो २०१२ साली आला. तोपर्यंत तेवढाही कायदेशीर आधार या प्रश्नाला नव्हता. भारत स्वतंत्र झाल्यापासून मानलं, तरी ६० हून अधिक वर्षं या स्वतंत्र देशात मुलं वाढत होती, त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होत होते आणि पालक, समाज, कायदा; कुणीही त्यांना दाद देत नव्हतं. याचं कारण आहे आपल्याकडे लैंगिकता या विषयाबद्दल मोकळेपणानं न बोलण्याची असलेली पद्धत.

मी आधी बाल-लैंगिक अत्याचारांबद्दल बोलले कारण ते बालकाच्या कुठल्याही वयात घडतात. अगदी तान्हेपणापासून. पण लैंगिकता हा विषय न बोलण्याचा असल्याचा आणखी एक परिणाम अगदी बहुतेक घरात घडतो. मुलगी/ मुलगा वयात येते/ येतो तेव्हा त्याच्या शरीरात आणि मुख्य म्हणजे मनातही काही बदल होतात. हे बदल प्रत्यक्ष पाळी येण्याच्या आधीच सुरू झालेले असतात; पण त्याबद्दल मोकळेपणानं बोललंच जात नाही. खरं तर तिला आपल्यात होत असलेले बदल आत्मविश्वासानं स्वीकारण्याची, ते अनुभवण्याची, त्याबद्दल मोकळेपणानं बोलण्याची जागा मिळावी आणि क्षमता यावी असं व्हायला हवं. मुलग्यांबाबत तर आणखी वाईट परिस्थिती आहे. त्यांना पाळी येत नाही तेव्हा काहीच सांगण्याची गरज नाही असं पालक मानतात. शिक्षणव्यवस्थेत आजही हे मुद्दे स्पष्टपणे येत नाहीत. २०२० साली आलेल्या शिक्षणधोरणात लैंगिकता शिक्षणाचा उल्लेखही नाही. मुलाला किंवा मुलीला स्वत:चं जगणं, वाढणं, लैंगिकता, जोडीदाराबद्दलच्या अपेक्षा, होऊ शकणारे लैंगिक अन्याय, आणि त्यापासून स्वत:चा शारीरिक आणि मानसिक बचाव करणं हे काहीही शाळेत शिकवलं जातच नाही. अगदी शिकवलं गेलंच, तर फक्त शरीरशास्त्र आणि लैंगिकसंबंधामधून उद्भवणारे धोके, बस्स!

मुलं अशीच मोठी होतात आणि अवतीभवतीच्या जगाला आणि नातेसंबंधांना आणि बरेचदा लग्नालाही तोंड द्यायला उभी राहतात. लग्नाच्या गाठी स्वर्गात वगैरे ठरत नाहीत. आजच्या काळात जाती-धर्म, रूप वगैरे मुद्दे बाद करायला हवेत. मी लग्न म्हणते आहे ते एकत्र जगणं. लग्न-समारंभ नाही. लग्न-समारंभाला येणाऱ्यांना त्या लग्नातून नवरा-बायकोला आनंद मिळतो की मनस्ताप ह्याच्याशी काही एक कर्तव्य नसतं. मी लग्नांना जायला कचरते. ते लग्न यशस्वी होतं की फसतं याबद्दल आपल्याला काहीच जबाबदारी वाटत नसेल तर आपण तिथे जाऊन जेवून, अहेर देऊन का यायचं असं मला वाटतं. माझ्या

मते लग्न करावं की करू नाही, करायचं तर कुणाशी करावं हा संपूर्ण वैयक्तिक मुद्दा आहे. वयाच्या एका टप्प्यावर लग्न केलं गेलं पाहिजे अशी कल्पना आपल्या समाजाच्या मनात आजही आहे. त्यात आता बदल होतो आहे ही स्वागतार्ह बाब आहे. आता काही मुलं-मुली लिव्ह-इन नातेसंबंधांचा विचार करतात, तो मुलांचा निर्णय आहे. यात फसवणूक, गोंधळ होणार नाहीत असं मुळीच नाही. अर्थात, ते लग्नातही आणि आईवडिलांनी ठरवलेल्या लग्नातही घडू शकतातच. मुद्दा असा आहे, की मुलांवर-मुलींवर आपला विश्वास आहे आणि तरीही काही चुकलंच, तर आपण त्यांच्या साहाय्याला आहोत ह्याची त्यांना खात्री वाटायला हवी.

आपल्या भारतीय परंपरेत देव, धर्म, परंपरा या बाबींना फार महत्त्व आहे. देव, धर्म वैयक्तिक आहेत हे खरंच; पण त्याबद्दल असं का किंवा कशावरून असे प्रश्न मुलं विचारतात आणि त्यांना गप्प बसवलं जातं. मला वाटतं, या गोष्टी आज तपासून घ्यायला हव्यात. मुळात ह्या गोष्टी सर्वांच्या भल्यासाठी निर्माण झाल्या असाव्या. पण अडचण अशी झाली, की पुढे त्यांचा वापर सत्ता बळकवण्यासाठी झाला. ह्यात कुठल्याही धर्माचा अपवाद नाही. ही गोष्ट जागतिक इतिहासात प्रत्येक काळात दिसते. आज धर्मवेड्या लोकांची वाढती ताकद आणि त्यातून येणारी आक्रमकता हा भारताच्या आणि जगाच्याही समोर आ वासून उभा असलेला प्रश्न आहे. आज जगासमोर अनेक अपरिहार्य प्रश्न आहेत. निदान देव-धर्मासारखे, आपल्या वैयक्तिक जीवनात आवडीपलीकडे ज्याला कोणतंही कारण देण्यासारखं नाही असे, मुद्दे आपण आता बाजूला ठेवावेत असं मला वाटतं. त्याहून महत्त्वाच्या मुद्द्यांकडे अधिक लक्ष पुरवावं.

एका कोविडनी आपली सर्वांची किती फे फे उडाली, विशेषत: गरिबांच्या जीवनात किती अडचणी आल्या हे आपण पाहिलेलं आहे. यानंतर असे अनेक प्रश्न आपल्यासमोर येणार आहेत. त्यांना तोंड देण्यासाठी आपल्या मुलामुलींनी तयार व्हावं, त्यांच्यात एकमेकांशी स्पर्धा न करता सहकार्य देण्या-घेण्याची आणि संकटांशी झुंजण्याची तयारी असावी. आपल्या मुलांचा असा विकास व्हायची आज कधी नाही एवढी गरज आहे. मूल नावाचं कोडं सुंदर तर खरंच; पण ते सुंदरच राहावं, त्याला कीड लागू नये या इच्छेनं मी आपल्याला हे सांगते आहे. ते गंभीरपणे घ्यायचं की नाही हे आपल्या सर्वांच्या हातात आहे.

संजीवनी कुलकर्णी
sanjeevani@prayaspune.org



लेखिका पालकनीती मासिकाच्या संस्थापक संपादक तसेच प्रयास संस्थेच्या विश्वस्त आणि आरोग्यगटाच्या समन्वयक, प्रगत शिक्षणसंस्था, फलटण या संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्य आहेत.

फॉर्म ४ वृत्तपत्र अधिनियम क्र. ८ प्रमाणे द्यावयाची माहिती
वृत्तपत्राचे नाव - पालकनीती
प्रसिद्धीकाल - मासिक
प्रकाशनस्थळ - अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे - ४११००४
प्रकाशकाचे नाव - डॉ. संजीवनी कुलकर्णी
राष्ट्रीयत्व - भारतीय
पत्ता - अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे - ४११००४
मुद्रकाचे नाव - डॉ. संजीवनी कुलकर्णी
राष्ट्रीयत्व - भारतीय
पत्ता - अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे - ४११००४
संपादकाचे नाव - डॉ. संजीवनी कुलकर्णी
राष्ट्रीयत्व - भारतीय
पत्ता - अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, पांचाळेश्वर मंदिराजवळ, कर्वे रस्ता, पुणे - ४११००४
मुद्रणस्थळ - जय ॲड्व्हर्टायझिंग
सी - १०२, सुनिता अपार्टमेंट, कसबा पेठ, पुणे - ४११०११

पालकनीती परिवार
(सार्वजनिक विश्वस्त निधी) चे विश्वस्त -
१) डॉ. संजीवनी कुलकर्णी, अमृता क्लिनिक, कर्वे रोड, पुणे ४
२) डॉ. विनय कुलकर्णी - ४, अश्लेषा अपार्टमेंटस्, डेक्कन जिमखाना, पुणे -४
३) नीलिमा सहस्रबुद्धे - ७, अनुप्रिता 'अ', गल्ली नं. ९, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे-३८
४) शुभदा जोशी - गुरुप्रसाद अपार्टमेंट, २३, आनंदनिकेतन सोसा., कर्वेनगर, पुणे-५२
५) वंदना कुलकर्णी - स्वोजस, सहवास सोसा., कर्वेनगर, पुणे-५२
६) रमाकांत धनोकर - सी, ३०१, सुनिता अपार्टमेंट, १४१७, कसबा पेठ, पुणे-११
७) प्रियंवदा बारभाई - अ-३, रोहन तपोवन, मेंढी फार्म जवळ, गोखलेनगर, पुणे-१६
मी डॉ.संजीवनी कुलकर्णी असे जाहीर करते, की वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.
तारीख ०१/०३/२०२१ डॉ. संजीवनी कुलकर्णी
प्रकाशक

कोविड एक संकट तर आहेच, पण त्या निमित्तानं...



तोलेश आणि सचिन

ही कहाणी आहे सिरसी गावच्या दोन तरुणांची. नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील सिरसी हे साधारण १५,००० लोकवस्तीचं गाव. गावातील लोकांच्या उदरनिर्वाहाचं साधन प्रामुख्यानं शेती किंवा दुसऱ्याच्या शेतात मजुरी. नाही म्हणायला गावातील पुढच्या पिढीतली मुलं उच्चशिक्षण घेऊन नोकरीसाठी म्हणून गावाबाहेर पडली आहेत. इथपर्यंत सगळं इतर गावांमध्ये असतं तसंच.

ह्या सगळ्याला कलाटणी मिळाली ती कोरोनामुळे. टाळेबंदीमुळे शहरात नोकरी करत असलेली बरीच मुलं आपापल्या गावाकडे परतली. त्यापैकीच एक आहे तोलेश बोरीकर. मेकॅनिकल इंजिनिअरींगचं शिक्षण घेतलेल्या तोलेशनं अझीम प्रेमजी विद्यापीठातून शिक्षणशास्त्रात पदव्युत्तर शिक्षणही पूर्ण केलं आहे. गावी परतलेल्या तोलेशच्या नजरेला पडली शाळा बंद असल्यामुळे इथे तिथे उद्देशहीन भटकणारी मुलं. गावांचं अर्थकारण शहरांपेक्षा अगदीच वेगळं असतं, त्यामुळे अशा लहान गावांत 'ऑनलाईन शिक्षण' वगैरे प्रकरण अवघडच. म्हणजे शाळा बंद, अभ्यास नाही आणि वाचन तर त्याहून नाही. वर काही ठिकाणी जुगार आणि तंबाखूही.

परिस्थिती अशी की कुठल्याही संवेदनशील व्यक्तीला ह्या मुलांची काळजी वाटावी. तशी ती तोलेशलाही वाटली; पण तो फक्त काळजी करून थांबला नाही. ह्या समस्येचं संधीत रूपांतर करण्यासाठी तो पुढे सरसावला. 'एक से भले दो' नुसार त्याचा मित्र सचिन डेकाटेही मदतीला आला. सचिनही इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर आहे. त्यानं आपल्या घरातली एक खोली उपलब्ध करून दिली, आणि तिथे सुरू झाली 'कल्पकता: रीडिंग रूम'.

'येईल त्या प्रत्येकाला प्रवेश' ह्या तत्त्वावर इथे मुलांना सामावून घेतलं जातं, कुठलंही शुल्क न आकारता. फक्त १० मुलं, १ खोली आणि ५० पुस्तकं एवढ्या शिदोरीवर सुरू झालेली रीडिंग रूम मधल्या सहा महिन्यांत २०० मुलं, ४ विविध ठिकाणच्या खोल्या आणि ८०० च्या वर पुस्तकं, एवढी विस्तारली आहे. इथे चालतं वाचन; पाठ्यपुस्तकांचं नाही, तर जीवनविचार रुजवणाऱ्या, मुलांना वाचनाचा निखळ आनंद मिळवून देणाऱ्या पुस्तकांचं. प्रथम, एकलव्य, ज्योत्स्ना, इकतारा, तुलिका अशा विविध प्रकाशनांची पुस्तकं इथे आहेत. हळूहळू ह्या वाचनाला त्यांनी शालेय अभ्यासाचीही जोड दिली आहे. तसेच क्षेत्रभेटी, नाटक, नृत्य, चित्रकला अशा उपक्रमांची जोड देत अधिकाधिक अर्थपूर्णता आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ह्या सगळ्याला मुलांचा मिळणारा उत्तम प्रतिसाद त्यांचा उत्साह वाढवणारा आहे.



ही पुस्तकं मिळवण्यासाठी अझीम प्रेमजी विद्यापीठातील प्राध्यापक, महाराष्ट्रातील काही संस्था आणि व्यक्तींनी मदतीचा हात पुढे केला. अर्थात, ह्या उपक्रमाचं मोठ्या वाचन-चळवळीत रूपांतर करायचं, तर असे शेकडो हात पुढे येणं गरजेचं आहे.

आता हळूहळू परिस्थिती पूर्वपदावर येत असताना गावातल्या शाळाही सुरू झाल्या आहेत. पूर्वी रीडिंग रूममध्ये दिवसभर मुलांची जा-ये असे. मात्र आताही शाळेव्यतिरिक्तच्या वेळात मुलांची पावलं रीडिंग रूमकडे वळताहेत, ही बाब उल्लेखनीय आहे. विशेष म्हणजे एकमेकांच्या सोबतीनं नवीन मुलंही येऊ लागली आहेत.

कोरोना अजून गेलेला नाही; पण जाईलही. तो गेला तरी हा उपक्रम आता असाच चालू ठेवण्याचं तोलेश आणि सचिननं नक्की केलंय. मुलांमध्ये वाचनसंस्कृती रुजून त्यांचं शिक्षण आनंददायी व्हावं, ह्यासाठीच आता त्यांनी काम करायचं ठरवलं आहे. गावाच्या ऋणातून मुक्त होण्याचा ह्यापेक्षा अभिनव प्रकार कुठला असणार? तोलेश आणि सचिनला पुढील वाटचालीसाठी पालकनीतीतर्फे शुभेच्छा!

– प्रतिनिधी

कोविड आणि महिला

सायली तामणे

कोविडकाळामध्ये जनजीवन विस्कळीत झाले. आबालवृद्ध, श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, सुशिक्षित-अशिक्षित; थोडक्यात, समाजातील सर्वच घटकांवर त्याचा कमी-अधिक परिणाम झाला. यातही महिलांवर नेमका कसा आणि काय परिणाम झाला ह्याचा नुकत्याच झालेल्या महिला-दिनाच्या पार्श्वभूमीवर आढावा घेऊ या.

कोविडमुळे शाळा बंद झाल्यामुळे मुलामुलींचे शैक्षणिक नुकसान झाले हे आपल्याला माहीत आहेच. त्याचा अजूनही एक मोठा परिणाम झाला. मुलींचे लग्न लवकर होण्याची शक्यता वाढली. या विषयावरच्या अभ्यासातही 'मुली शिक्षणामध्ये, शिक्षणप्रक्रियेमध्ये गुंतलेल्या असतात, तोपर्यंत त्यांचे लग्न पुढे ढकलले जाण्याची शक्यता अधिक असते' हे दिसते. मुली शिक्षणात गुंतलेल्या असल्या, की त्या घरात कमी वेळ असतात. एखादी मुलगी घरातच बसून असेल, तर 'उगीच काहीतरी (?) व्हायच्या/ करायच्या आत' तिचे लग्न करून देऊ असा विचार अनेकदा पालकांच्या मनात असतो. मात्र ती शाळेत जात असेल, तर 'शाळा शिकणे संपू दे, मग लग्न करू' असा विचार व्हायची शक्यता जास्त असते. तसेच शाळा नसेल, तर मुलींनी कामावर जाण्याचे, कामासाठी घरापासून लांब जाण्याचे प्रमाण वाढते. यातून काही ठिकाणी त्या स्वतःच लैंगिकदृष्ट्या सक्रिय होऊ शकतात, मग लग्न करायचाही निर्णय घेतात असेही दिसते. आदिवासी समाजात लग्नाआधीच्या गर्भधारणेला गैर मानले जात नाही. त्यामुळे लग्न न करतादेखील लैंगिकदृष्ट्या सक्रिय होण्याची शक्यता असते. त्यासोबत शाळा थांबते.

कोविडकाळात सगळे जगच जणू जागच्याजागी थांबले. शाळा बंद झाल्या. आश्रमशाळा (फक्त आदिवासी मुलामुलींसाठी चालणाऱ्या रहिवासी शाळा) बंद झाल्या. त्यात शिकणाऱ्या मुलामुलींना परत त्यांच्या घरी पाठवण्यात आले. कोविडमध्ये शाळा बंद होण्याचा परिणाम म्हणून किशोरवयात गर्भधारणा होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. किशोरवयातील नैसर्गिक शारीरिक आवाहनाचा आणि स्वनियंत्रणाच्या कमतरतेचाही यामध्ये हात आहे. या सगळ्या प्रकारात पुढील शिक्षणाच्या शक्यता तर बंद होतातच; सोबत त्याचे मुलींवर शारीरिक, मानसिक, आर्थिक परिणामदेखील होतात.

या सगळ्यात दुसरी एक गुंतागुंत पॉक्सो (Protection of Children from Sexual Offences - POCSO) कायद्यामुळेदेखील निर्माण होते. मुलगी अल्पवयीन असेल आणि मुलगा १८ वर्षांवर म्हणजेच सज्ञान असेल, तर दोघांच्या संमतीने, अगदी लग्नाच्या चौकटीत किंवा संमतीने झालेला शरीरसंबंधदेखील पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत बलात्कार समजला जातो. यामुळे काय होते, तर अशा शरीरसंबंधातून निर्माण होणारी गर्भधारणा नको असेल, तर मुली डॉक्टरांकडे जातात. अल्पवयीन मुलीचा गर्भपात करण्याआधी डॉक्टरांनी पोलिसांना कळवणे त्यांच्यावर बंधनकारक असते. बरे पोलिसांना कळविले, तर शरीरसंबंध ठेवणाऱ्या मुलावर, तो सज्ञान असल्यास, बलात्काराचा गुन्हा नोंदविला जातो आणि तो सज्ञान नसेल, तर त्याला बालसुधारगृहात ठेवले जाते. गर्भपाताच्या घरगुती प्रयत्नात किशोरवयीन मुलींच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. या सगळ्या गुंतागुंतीमुळे किशोरवयीन गर्भधारणेबद्दलची प्रत्यक्ष आकडेवारी स्पष्ट होत नाही. कमी वयात गरोदर राहिलेल्या मुलींच्या घरात, सासरी 'हिला पुढच्या वर्षी शाळेत पाठवाल का?' असे कार्यकर्त्यांनी विचारले असता 'मग घरातली कामं कोण करेल?' अशी उलट विचारणा झाली.

गडचिरोली आणि इतर काही जिल्ह्यांमधील अनेक भागांमध्ये वीज आणि नेटवर्कच नियमित नाही, तर ऑनलाईन शिक्षणाबद्दल काय बोलणार? एकवेळ ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारी सोय झाली, तरी घरात राहून, घरातली कामे सोडून ऑनलाईन क्लास कोण करू देईल? म्हणजे एक शैक्षणिक वर्ष गमावण्यापासून, शाळा कायमची सुटणे ते अगदी किशोरवयात गर्भधारणा होण्यापर्यंत विविध प्रकारच्या परिणामांना मुलींना

तोंड द्यावे लागत आहे. काही मुलींनी शाळा सुरू नसली, तरी यातून सुटण्यासाठी हॉस्टेलला जाऊन राहण्याचा मार्ग स्वीकारला आहे. अर्थात, हे सगळ्यांनाच शक्य होऊ शकत नाही.

हे झाले किशोरवयीन मुलींबद्दल. आरोग्यक्षेत्रात काम करणाऱ्या प्रौढ स्त्रियांनाही वेगळ्या प्रकारे त्रास झालाच.


आरोग्यक्षेत्रावर या काळात खूप ताण आला. त्यातही महिलांना विविध प्रकाराचा ताण सहन करावा लागत आहे. एकूणच संपूर्ण जगात आरोग्यक्षेत्रात स्त्री-कर्मचाऱ्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. WHO संस्थेच्या पाहणीनुसार आरोग्यक्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींपैकी जवळजवळ ७०% महिला आहेत. एकूण आरोग्यक्षेत्रात वरच्या फळीपेक्षा फिल्डवर्कर्समध्ये महिलांची संख्या लक्षणीय आहे. अगदी महाराष्ट्रात बघितले, तर ग्रामीण आणि शहरी भागात मिळून साधारण ७०,००० महिला 'आशा-वर्कर' आहेत. कोविडच्या काळात त्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारच्या ताणांना सामोरे जावे लागले आहे. एक तर ह्या काळात त्यांना सातत्याने काम करावे लागले. त्यातली अनिश्चितता, भीती या गोष्टी तर होत्याच, शिवाय वैयक्तिक आयुष्यात घरातील कामांपासून त्यांची सुटका नव्हती. उच्च आर्थिक वर्गातील महिला डॉक्टर्सना घरातील कामे करण्यातून सुटका निदान शक्य तरी होती. मात्र नर्सेस, आशा-वर्कर्स, ANM, अंगणवाडी सेविकांना दुहेरी काम करावे लागले. सेवा देणाऱ्या डॉक्टर्सनादेखील अनेक ठिकाणी घरात, बिल्डिंगमध्ये राहू द्यायला आजूबाजूच्या लोकांनी या काळात नकार दिला, तिथे निम्न आर्थिक स्तरातील या महिलांबद्दल काय बोलायचे? त्यांच्या घरचे लोक, नातेवाईक, शेजारीपाजारी या सगळ्यांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि त्यातून दिली जाणारी वागणूक या सगळ्यांशी दोन हात करत या सगळ्या महिलांनी केलेली कर्तव्यपूर्ती बघता त्यांचे कौतुक करू, तेवढे कमी आहे.

एकूण कोविडच्या निमित्ताने एकीकडे स्त्रियांनी दाखविलेली हिंमत, उचललेली जोखीम आणि संकटाशी दोन हात करण्याची वृत्ती अधोरेखित झाली, तर दुसरीकडे सामाजिक, आर्थिक, राजकीय निर्णयांचा त्यांच्यावर होणारा विपरीत परिणामदेखील दिसून आला. आपल्या देशातील पुरुषप्रधान मानसिकतेमुळे आणि सामाजिक चौकटींमुळे, स्त्रिया अगतिक (vulnerable) ठरतात हे लक्षात घेतले पाहिजे. कोणताही राजकीय निर्णय घेताना, धोरण ठरवताना त्याचा महिलांवर काय परिणाम होईल याचा वेगळा विचार होण्याची गरज आहे. महिला दिन साजरा करताना आपण महिलांच्या समान हक्कांबद्दल बोलतो; पण ते हक्क प्रत्यक्षात आणताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते हे विसरून जातो. त्यामुळे स्त्रियांचा विचार करताना समानतेसोबत सहवेदना (empathy) देखील हवी, हे ह्या निमित्ताने लक्षात घ्यायला हवे.

एक घटना इथे मला आवर्जून सांगावीशी वाटते. महाराष्ट्राच्या कोपऱ्यातील गडचिरोली जिल्हा तिथले जंगल, नक्षलवाद, सामाजिक संस्थांचे काम अशा विविध कारणांनी महाराष्ट्राला ठाऊक आहे. कोविड आणि त्यानंतर येणारा लॉकडाऊन, पसरलेली भीती याचा परिणाम इथेही झालाच. अजूनही सरकारी दवाखान्यांमध्ये येण्यासाठी विविध कारणांमुळे मागे हटणारा आदिवासी समाज दवाखान्यांमध्ये येण्यासाठी अधिकच कचरू लागला. अशातच दीड महिन्याच्या आजारी बाळाला आहेरीतल्या सरकारी दवाखान्याच्या नर्स आणि डॉक्टरांनी गावात तपासले. हगवण लागल्याने बाळाची स्थिती नाजूक झाली होती. पुढचे उपचार दवाखान्यात सलाईन इंजेक्शनने करावे लागणार होते. त्यासाठी १५ किमी दूर प्राथमिक आरोग्यकेंद्रात नेण्यास बाळाच्या आईने नकार दिला, ती दवाखान्याची खूप भीती घेऊन बसली होती. खूप समजावूनही ऐकेना, तेव्हा डॉ. संगीता ह्यांनी प्रयत्न करून पाहिला. 'तुम्ही चला तुमच्या बाळाला आपण माझ्या घरी ठेवून बरं करू', असे म्हटल्यावर बाळाची आई तयार झाली. पुढचे तीन दिवस बाळ आणि आई डॉक्टरांच्या घरी राहिले, बाळावर उपचार घेऊन बरे होऊन घरी परतले. कोविडकाळात आपल्या क्षमतांच्या पलीकडे जाऊन, अत्यंत संवेदनशीलपणे काम करणाऱ्या अशा अनेक महिला आहेत.

सायली तामणे

sayali.tamane@gmail.com



लेखिका पालकनीतीच्या संपादकगटाच्या सदस्य असून त्यांनी शिक्षणक्षेत्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे. त्या सध्या विविध सामाजिक संस्थांसाठी शैक्षणिक साहित्यनिर्मितीचे काम करतात.

गुजगोष्टी भाषांच्या

रमाकांत अग्निहोत्री

एखाद्या प्रांतात तिथली भाषा ज्या प्रकारे बोलली जाते, तोच त्या भाषेचा शुद्ध प्रकार तिथल्या लोकांना वाटतो, ते साहजिकच आहे, मात्र तोच शुद्धतेचा निकष म्हणून सर्वांनी मान्य करावा असा आग्रह साफ चुकीचा आहे.

आपल्या मातृभाषेचा आपल्याला विनासायास मिळालेला वारसा आपण कळत नकळत जोपासत असतो आणि पुढील पिढीकडे अभिमानाने सोपवत असतो; त्यामध्ये आपल्या भाषेविषयीच्या आपल्या समजुती, त्या समजुतींवर आधारित आपली वागणूक आणि त्याबरोबरच इतर भाषांविषयीचे आपले समज-गैरसमज हेही या वारशाचे अविभाज्य घटक असतात. त्यामुळे वारसा पोचवण्यासोबत त्यांचे दुष्परिणामही आपण पक्के करत असतो.

सन १६२० मध्ये, म्हणजे अनेक शतकांपूर्वीच, फ्रान्सिस बेकन ह्यांनी आपल्या नोवम ऑरगॅनम या ग्रंथात म्हटले आहे, की आपण भाषेबद्दल कोणतीही नवी गोष्ट शोधायची म्हटली की तिला आपल्या खुराड्याचा, जातीजमातीचा, एवढेच नाही, तर मनात निर्माण होणाऱ्या प्रतिमांचा आणि बाजारपेठेचा कडाडून विरोध होत असतो. बेकनच्या सूचनांकडे आपण आजही दुर्लक्षच करत आहोत.

शाळा-महाविद्यालयाच्या पातळीवरच आपण योग्य उपाययोजना केल्या नाहीत, भाषेच्या अभ्यासाची पारंपरिक व्याकरण-पाठांतर पद्धतीच्या बेड्यांतून सुटका केली नाही आणि त्याऐवजी भाषा शिकवण्याची अधिक शास्त्रशुद्ध पद्धत अमलात आणली नाही, तर आता जे घडते आहे आणि पूर्वी जे घडत आले आहे, तेच भविष्यातही घडणार आहे. त्यामुळे मुलांची आणि पर्यायाने समाजाची भाषा अशीच दुर्लक्षित राहील, वर्गांत अशीच निःस्तब्ध शांतता राहील आणि इंग्रजी शिकवण्याचा दुराग्रह आणखी आणखी वाढतच जाईल. ह्यातून मोजके प्रस्थापित वर्ग आणखी बलवान होतील आणि दुबळा समाज अधिकाधिक उपेक्षित राहील. मुळात बहुसंख्य समाज असा उपेक्षितच असताना उपेक्षितांकडे दुर्लक्ष ही मांडणी चुकीचीच ठरेल. दुर्लक्ष होतच राहील आणि त्याची जाणीवही राहणार नाही.

बोलीभाषा

भाषा आणि बोली या दोन वेगळ्या गोष्टी आहेत हे एक मिथक असल्याचे म्हटले जाते. भाषाशास्त्रांवर संशोधन करणारे तज्ज्ञ मानतात, की या दोन गोष्टी वेगळ्या नसून एकमेकांशी दृढ संबंधित आहेत. उच्चार, शब्द, वाक्य, अर्थ आणि संवाद, अशा सगळ्याच बाबतीत त्या सारख्याच परिपूर्ण असतात. आजच्या एका भाषेतून उद्याच्या दोन भाषा जन्माला येऊ शकतात. याची अनेक उदाहरणे आहेत. हिंदुस्तानी भाषेतून निर्माण झालेल्या हिंदी आणि उर्दू किंवा सर्बो-क्रोएशियन भाषेतून तयार झालेल्या सर्बियन आणि क्रोएशियन या दोन भाषा, इ. मूळ भाषेलाच काही वेळा कालांतराने बोलीभाषेचे स्वरूप येऊ शकते. आज ब्रज, मैथिली, अवधी, भोजपुरी वगैरे भाषा बिनदिक्कतपणे हिंदीच्या बोली मानतात. पण अगदी काही दशकांपूर्वीपर्यंत मोठमोठे कवी हिंदी भाषेत कविता लिहिणे कमीपणाचे मानत असत आणि ब्रजभाषाच मूळ भाषा आहे असे त्यांचे मत असे. आजच्या ‘पिडजिन’ किंवा ‘क्रिओल’ यासारख्या तथाकथित बोलीभाषा कदाचित उद्याच्या प्रमाणभाषा होऊ शकतील आणि त्याउलट आजच्या प्रमुख भाषा उद्याच्या बोलीभाषा ठरू शकतील. नियमावली बनवणे, तपशीलवार वर्णन करणे, व्याकरण, शब्दकोश आणि संदर्भ साहित्य-सामुग्री यांच्या माध्यमातून भाषेच्या एखाद्या प्रकाराचे प्रमाणीकरण करणे ही एक सामाजिक-राजकीय प्रक्रिया आहे. संधी मिळाल्यास कोणत्याही भाषेमध्ये प्रमाणभाषा होण्याचे सुप्त गुण असतात.

आपापल्या मनाच्या गाभाऱ्यात आपण प्रत्येकानेच भाषेच्या आदरणीय प्रतिमा उभारलेल्या असतात. आपल्याला

त्या जशा असायला हव्या असतात, ते गुण आपणच त्यांना चिकटवत असतो आणि त्यांच्याकडे पाहत असतो. ही मिथके असतात आणि नकळत प्रत्येकाच्याच मनाचा ताबा घेऊन बसलेली असतात. त्यांचेच रूपांतर कालांतराने आपल्या सामाजिक-मानसात होत असते. ज्यांनी भारताचे संविधान वाचलेही नाही असे लोक ठामपणे हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे असे म्हणतात. संसदेत झालेल्या घमासान चर्चेमधून (त्यांना CAD, constituent Assembly Debates म्हणतात), आपले संविधान निर्माण झालेले आहे; विशेषतः भाषेवर उभी-आडवी चर्चा झाल्यानंतर भाषेविषयी काही कायदेशीर तरतुदी स्वीकारण्यात आल्या होत्या. कलम ३४३-३५१, विभाग XVII तसेच आठव्या पुरवणीत (Schedule) भारतातील भाषांविषयीच्या मुद्द्यांवर टिप्पण्या आहेत. हिंदी ही भारतीय संघराज्यातील एक अधिकृत भाषा आहे, राष्ट्रभाषा नाही. पण अनेक भारतीय हिंदीला राष्ट्रभाषा मानतात, तसे उल्लेख त्यांच्या लेखनातही करतात. तामिळनाडूमध्ये झालेल्या हिंदीविरोधी लढ्यात ६६ लोकांनी आपले प्राण गमावले, दोघांनी तर स्वतःला जाळून घेतले. त्यानंतरच भारत सरकारला जाणीव झाली, की लोकांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर एखादी भाषा लादता येणार नाही आणि विद्यार्थी-चळवळीचे दमन करायचा प्रयत्न झाल्यास त्यांचे पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाजच त्या चळवळीला सक्रिय पाठिंबा देईल. इंग्रजी भाषेला १९६५ मध्ये संलग्न अधिकृत भाषेचा दर्जा मिळाला. एका राष्ट्रभाषेऐवजी अनेक संलग्न अधिकृत भाषा स्वीकारणे हा राजकीय सुज्ञपणाच म्हणायचा. अर्थात, तरीही भारतीय मानसातून (हिंदी) राष्ट्रभाषेचे मिथक अजून निवळलेले नाही.

आपल्या संविधानाचे आठवे कलम बघावे. त्याची आपल्या मनातील प्रतिमा भारतीय भाषा, राष्ट्रीय भाषा, स्थानिक भाषा, किंवा राज्यांच्या भाषा ह्यापैकी काहीतरी आहे. प्रत्यक्षात शीर्षक फक्त 'भाषा' एवढेच आहे. कोंकणी, मणीपुरी, बोडो, नेपाळी, डोग्री आणि संथाली यांसारख्या भाषा (ह्या भाषांना बोलीभाषा किंवा आदिवासी/ अल्पसंख्याक भाषा असे म्हणत दुर्लक्षिले जात होते) तर संविधानाच्या आठव्या कलमातून वगळल्याच गेल्या असत्या. सुरुवातीला ह्यात फक्त १४ भाषा होत्या. लवकरच त्यात सिंधी भाषेचा समावेश करण्यात आला. आजच्या घडीला त्यात २२ भाषा असून नवीन भाषांचे त्यात स्वागत आहे. वरकरणी ह्या यादीत आपल्याला काही विशेष वाटणार नाही; पण भारताची बहुभाषिकता आणि जनसामान्यांची अस्मिता ह्यांना जोडणारा तो एक दुवा आहे. ही यादी खुली ठेवलेली असल्याने त्यात नवीन भाषांचा समावेश करणे शक्य आहे. ह्यातून राज्यांच्या आर्थिक ओझ्यात किंवा व्यवस्थापन क्षमतेवर वगैरे काहीही परिणाम न होता त्या त्या भाषेला महत्त्व मिळवून देता आले आहे.

परिपूर्ण संस्कृत

भारतीय जनमानसात रूढ असलेले आणखी एक मिथक म्हणजे संस्कृत ही काहीतरी विशेष भाषा आहे, ती परिपूर्ण असून तिचे लेखन बिनचूकपणे करता येते, तसेच संस्कृतमध्ये पूर्णपणे निर्दोष पद्धतीने बोलता येते. अनेक जण मानतात, की संस्कृत ही जगातील बहुतेक सर्व भाषांची जननी आहे, भारतीय भाषांची माता तर ती नक्कीच आहे. बंगाली, गुजराती, मराठी, हिंदी, पंजाबी वगैरे इंडो-आर्यन भाषा निर्विवादपणे संस्कृतमधून उत्पन्न झालेल्या आहेत; परंतु हेही तितकेच खरे आहे, की तिबेटो-बर्मन कुळातील उत्तर-पूर्वेकडील भाषा, दक्षिणेतील द्राविडी भाषा आणि देशातील अनेक आदिवासी-गिरीवासी लोकांच्या मुंडा भाषा ह्यांच्याशी संस्कृत भाषेचा काहीही संबंध नाही. अर्थात, त्यातील बऱ्याच भाषांनी इंडो-आर्यन भाषा-कुळाप्रमाणेच संस्कृतमधील शब्द उचलले आहेत. पण म्हणजे त्या भाषा संस्कृत भाषेतून निर्माण झाल्या आहेत असे नाही.

आणखी एक साचेबंद विचार म्हणजे, उच्चार आणि लिपी ह्यांच्यातील परस्परसंबंध. देवनागरी लिपीला इतर लिपींपेक्षा श्रेष्ठ समजले जाते. ह्याचे कारण संस्कृत देवनागरी लिपीत लिहिली जाते. संस्कृत भाषा आणि तिची लिपी ही परमेश्वराकडून आलेली देणगी आहे असे का मानले जाते, कळत नाही. उच्चार आणि लिपी यांच्यातील साधर्म्य संस्कृतच्या बाबतीत आदर्श समजले जाते. पण तेही फारसे खरे नाही, कारण उच्चार आणि लिपी ह्यांच्यात मुळात कुठलेही सुप्त नाते नसतेच. संस्कृत १४ वेगवेगळ्या लिपींमध्ये लिहिली जाते आणि किरकोळ फेरफार केल्यास ती जगातल्या कोणत्याही लिपीत लिहिणे शक्य आहे. कोणत्याही भाषेसाठी आपण काही दिवसातच नवीन लिपी बनवू शकतो. एखाद्या भाषेसाठी नवीन लिपी बनवणारे उच्चार आणि लिपी यांच्यामधील परस्परसंबंध प्रगल्भ करण्याचाच प्रयत्न करणार हे उघड आहे. मात्र लिखित स्वरूपापेक्षा बोलीरूपात भाषा झपाट्याने बदलत असल्याने कालांतराने बोलणे आणि लिहिणे या दोहोंत ठळक विसंगती

निर्माण होणार हेही स्पष्टच आहे. लेखी भाषेत फारसे फेरफार होऊ न देण्यास अनेक सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक कारणेही असतात. उदारणार्थ लेखन हे काळ आणि स्थान, मांडणी करणारी व्यक्ती यांच्या पलीकडेही अस्तित्वात राहू शकते आणि त्यामधून व्यक्त होणारा मथितार्थ शक्यतो फारसा बदलू नये यासाठी तिच्यामध्ये फार बदल होत राहू नयेत. याउलट संभाषणपद्धतीत सातत्याने बदल होतच राहतात.

मात्र मर्यादित ज्ञान किंवा विशिष्ट धोरणांना चिकटून बसणाऱ्या विद्वानांनी आपापल्या भाषेची प्रतिमा अशी अढळ मानलेली आहे. याचे टोक म्हणजे एखाद्या भाषेला निरंकुश प्रमाणभाषा मानणे. अशा भाषेची हे विद्वान निगराणी करतात आणि तिला चिरस्थायित्व देण्याचा प्रयत्न करतात. हे विद्वान असल्यामुळे शिक्षक आणि पालकांनी त्या प्रयत्नांना दुजोरा देणे ओघाने आलेच. प्रथम आपण हिंदी भाषेचे उदाहरण घेऊ. प्रेमचंद, प्रसाद, द्विवेदी, रेणू किंवा केदारनाथ यासारख्या उत्तम कवी-लेखकांनी ती अजरामर केलेली आहे खरेच; पण जरा विचार करून बघा. भारतात किंवा परदेशात कुठे अशी प्रमाण-हिंदी बोलली जाते? मेरठ किंवा अलाहाबादमधील काही भाग सोडल्यास कुठेही नाही. खूप मोठ्या प्रदेशात भोजपुरी, अवधी, मैथिली, ब्रज ह्या भाषा किंवा त्यांची बोलीरूपे प्रचलित आहेत. इंग्रजी बघितली तर शॉसर, शेक्सपिअर, मिल्टन, शॉ, किट्स किंवा इलियट ही नावे आपल्याला आठवतात. इंग्रजी (किंवा गेला बाजार कुठलीही क्ष भाषा) विस्तृत भागात बोलली जाते, तिची लिपी अनेक भाषांना सहजी स्वीकारण्याजोगी आहे, ती व्याकरणशुद्ध आहे, तिच्या मागे समृद्ध साहित्य-परंपरा आहे, ही गृहीतके म्हणजे दंतकथा असतात.

उत्तर भारतातील शाळांमध्ये साधारणपणे दुसऱ्या यत्तेपासून हिंदी, संस्कृत आणि इंग्रजीचे व्याकरण शिकवतात. इतर राज्यांमध्येही भाषा बदलल्या तरी शिकवण्याची पद्धत हीच आहे. आणि तरीही १०-१२ वर्षांच्या भाषा-शिक्षणानंतर मुलांना त्या भाषेचा स्वभावधर्म, तिचा आकृतिबंध स्पष्ट झालेला नसतो. ह्यातून भाषेबद्दलचे गैरसमज अधिकाधिक दृढ होत जातात. भाषाशिक्षणाऐवजी आता भाषेचा शास्त्रीय अभ्यास करणे शक्य आहे. त्यातच व्याकरणही अंतर्भूत असेल. तर्कसुसंगत प्रश्न कसे विचारावे ह्याची मुलांना प्राथमिक माहिती करून देणेही शक्य होईल. मुलांच्या मनात भाषा असतेच. शब्दांची वर्गवारी करणे, त्यांचे वेगवेगळ्या गटात वर्गीकरण करणे, त्यांची नियमानुसार मांडणी करणे, ह्या गोष्टी करण्याची त्यांच्याकडे सुप्त क्षमता असते; गरज असते ती योग्य मार्गदर्शन मिळण्याची. भाषाशास्त्राचे ज्ञान असणारे शिक्षक नेमणे किंवा असलेल्याच शिक्षकांना आवश्यक प्रशिक्षण देणे यासाठी लागेल तोच काय तो खर्च. याची काय गरज हा प्रश्न बहुधा कोणी समजदार माणूस विचारणार नाही. भाषा ही आपल्या अस्तित्वाची निदर्शक आहे आणि ज्ञाननिर्मिती ही शेवटी भाषेतूनच होत असते, हे लक्षात घेतल्यास ह्या उपक्रमाचे महत्त्व आणखी फुगवून सांगायला नको.

('द हिंदू' मधून साभार)

रमाकांत अग्निहोत्री
agniirk@yahoo.com



लेखक दिल्ली विद्यापीठाचे भाषाशास्त्र विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले आहेत.

अनुवाद: दिलीप देशपांडे

वाचकांचा प्रतिसाद...

फेब्रुवारीचा अंक आजच पोचला. पूर्ण वाचल्यावरच खाली ठेवला, विशेषतः सायली तामणे यांचा लेख खूप अंतर्मुख करणारा आहे. आज चंगळवादाकडे झपाट्याने होणारी माणसाची वाटचाल आणि त्याचे होणारे दुष्परिणाम त्यांनी अगदी मोजक्या शब्दांत मांडलेत तसेच सुजित सिन्हा यांच्या लेखातील शिक्षणपद्धत वाचून असे काही होण्याची नितांत गरज आहे असे वाटत राहिले...

ॲड. पूर्णिमा सुतार, न्यू पनवेल



अनारको के आठ दिन

मानसी महाजन

अनारको के आठ दिन
लेखक: सतीनाथ षडंगी उर्फ सत्यु
प्रकाशक: राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली

सतीनाथ षडंगी उर्फ सत्यु सामाजिक कार्यकर्ते आहेत. IIT वाराणसीहून त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. १९८४ साली भोपाळ दुर्घटनेनंतर मदतीसाठी ते भोपाळला गेले आणि तिथेच राहिले. तेथील पीडित लोकांना वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी त्यांनी संभावना ट्रस्टची स्थापना केली आहे.

'अनारको के आठ दिन' हे त्यांचे एक सार्वकालिक म्हणावे असे पुस्तक आहे. हे पुस्तक शिक्षणकर्मी, पालक, अभ्यासक अशा सगळ्यांना छोट्यांच्या भावविश्वाचा परिचय करून देते. प्रत्येक पालकाने वाचावे अशा ह्या पुस्तकातील काही भागांचा मराठी अनुवाद पूर्वी पालकनीतीमध्ये वाचल्याचे वाचकांना आठवत असेल. नवीन पालकांसाठी पुन्हा एकदा ह्या पुस्तकाला उजाळा देत आहोत. अनारकोचे पूर्वी येऊन गेलेले अनुवाद खालील लिंकवर वाचता येतील

http://bit.ly/anarko_village_bridge
http://bit.ly/anarko_yamlok
http://bit.ly/anarko_logic

कोणतेही पुस्तक वाचताना आपण नकळत त्यात स्वतःला शोधत असतो. एखादा विचार, पात्र किंवा प्रसंगामध्ये आपले प्रतिबिंब उमटलेय का हे पाहत असतो. सतीनाथ षडंगी उर्फ 'सत्यु' लिखित 'अनारको के आठ दिन' या पुस्तकात आपल्याला आपण अगदी सहज गवसतो, प्रत्येक पानात सापडत राहतो; 'विद्या क्या सिर्फ स्कूल से आती है पापा?' असा भाबडा प्रश्न विचारणाऱ्या चुणचुणीत अनारकोमध्ये, उत्तर माहीत नसले की 'चल मुँह धोकर पढ़ने बैठ जा' म्हणून स्वतःची सुटका करून घेणाऱ्या तिच्या आईबाबांमध्ये, तर कधी 'मछलियाँ बचपन से ऐसी हैं, तो बचपन का इलाज किया जाए' असे फर्मावणाऱ्या राजामध्ये. 'मोठे' होण्याच्या नादात स्वतःवर सोईस्करपणे चढवलेले मुखवटे पुस्तक वाचताना वाचकाला स्पष्ट दिसू लागतात.

'अनारको के आठ दिन'मध्ये अनारकोच्या दैनंदिन आयुष्यातील आठ प्रसंग आहेत. शाळेची घंटा वाजणे, सी-सॉ वर बसणे, शाळेची परीक्षा, देवळात जाणे असे अगदी रोजच्या आयुष्यातले साधे-साधे प्रसंग. प्रसंग जरी मामुली असला तरी त्याबद्दल अनारकोचे प्रश्न आणि विचार मात्र अगदी खास असतात. साध्यासोप्या प्रसंगांमधून लेखकाने खुबीने वाचकाला विचार करायला प्रवृत्त केले आहे.

अनारको मुळात अतिशय विचारी मुलगी आहे. तिची कल्पनाशक्ती अफाट आहे. त्यावर स्वार होऊन, तिच्या लाडक्या काटेसावरीच्या झाडाच्या कापसासारखी तीसुद्धा अलगद उडत वेगवेगळ्या काल्पनिक दुनियांमध्ये सफर करते.

या अद्भुत दुनियेत नदीतले मासे त्यांच्या व्रात्य मुलांना एका जागी शांत बसवून मोठ्यांना हवे ते, हवे तसे पढवण्यासाठी शाळा सुरू करण्याचे कारस्थान करतात. या दुनियेत कधी आई बाबा होते, बाबा आई होतात, शिक्षक विद्यार्थी होतात, विद्यार्थी शिक्षक होतात आणि त्या गमतीतून नात्यांमधली सत्तेची उतरंड वाचकाला हलकेच टोचते. अनारकोच्या काल्पनिक दुनियेतील प्राणी आधी मिळून-मिसळून राहत असतात; पण माणसाने सुचवल्यानंतर, जंगलातील सर्वात 'बढिया' प्राणी कोण, हे ठरवण्यासाठी माणसांच्या शाळेसारख्या परीक्षा घेऊ लागतात, जमिनीतून रंगीबेरंगी पक्ष्यांचे फवारे उडतात, खुर्च्यांना पंख फुटतात; एक ना अनेक! अनारकोच्या कल्पना विलक्षण असतात, परंतु आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे मोठ्यांकडून न मिळाल्याबद्दलचा तिचा अस्वस्थपणा, आणि प्रश्नाच्या मुळाशी जाण्याची तिची धडपड त्यामधून वाचकाला जाणवते.

'देवाला अभिषेक करून ये', म्हणून एकदा आई अनारकोला सकाळी लवकर उठवत असते. अनारकोला जाण्याची अजिबात इच्छा नसते.

...अनारकोने पूछा, ''क्या ठाकुरजी[१] को खुश करना जरूरी है?''

तो माँ ने जोरसे कहा, ''ये भी कोई पूछने की बात है? चल उठ और मंदिर जा!''

अनारकोने समझाते हुए कहाँ, ''अच्छा ठाकुरजी क्या सिर्फ मंदिर में रहते हैं?''

अम्मा को मौका मिला और वह कहने लगीं, ''बेटी, ठाकुरजी तो हर जगह रहते हैं - पत्थरों में, पेड़ों में, घर में, दीवार में और पता नहीं कहाँ कहाँ।''

इसपर अनारकोने कहा, ''फिर मैं लोटे का यह पानी बाहर भिंडी के पौधों में डाल आऊं?''

माँ ने इसपर कुछ नहीं कहा। खींचकर उसे बिस्तर से नीचे उतारा और जमा दी चपत।...

प्रसंग छोटेसेच असतात; खूप काही दाखवून देणारे! लहान मुलांना सदैव उपदेशाचे अमृत पाजण्याची मोठ्यांना सवय असते; मोठी माणसे मात्र त्याप्रमाणे वागताना दिसत नाहीत. हे धडधडीत सत्य मान्य करण्याचा प्रांजळपणासुद्धा मोठे दाखवत नाहीत. उलट मुलांकडून निरुत्तर व्हायची वेळ आल्यास हात उगारून त्यांनाच गप्प करतात. किती हा दुटप्पीपणा!

१ - श्रीकृष्ण भगवान

...उपदेश देंगे और खुद उसपर नहीं चलेंगे। आखिर पापा और अम्मी जो उपदेश देते हैं, कितनो को वे खुद मानते हैं? अम्मी कहती हैं - झूठ मत बोलो - और खुद झूठ बोल आएँगी कि हमारे यहाँ तो कोई बासी रोटी खाता ही नहीं। पापा कहेंगे कि कभी मारपीट मत करना और खुद अम्मीको पकड़कर चाँटा मारेंगे जब उनको गुस्सा आएगा, या अखबार पढ़ते पढ़ते झल्लाएँगे, ये लोग बम क्यों नहीं फेंक देते पकिस्तानपर! बाहर हो या घर, उपदेश ही उपदेश - वैसे ही झूठे!...

आजूबाजूला घडणारे साधेसुधे प्रसंग अनारकोला निराळ्या दृष्टिकोनातून दिसतात. तिला पडणारे प्रश्न अगदी तर्कशुद्ध आणि योग्य असले, तरी त्यांची उत्तरे देताना इतरांच्या नाकी नऊ येतात. कदाचित ते प्रश्न मूलभूत आणि तर्कशुद्ध असल्यानेच त्यांची उत्तरे देणे मोठ्यांना अवघड जाते.

गावात बांधलेल्या नवीन पुलाच्या उद्घाटन समारंभासाठी पंतप्रधान येणार असतात.

...मास्साब[२] ने पूछा, ''अच्छा बताओ, आज कौन आ रहे हैं अपने यहाँ?''

अनारको खड़ी हो गई और पूछा, ''प्रधानमंत्री कौन होते हैं?''

मास्साब अकड़-से गए, ''तुम प्रधानमंत्री नहीं जानती? देश के प्रधानमंत्री! अच्छा चलो बताओ, हमारे देश के प्रधानमंत्री का नाम क्या है?''

नाम तो अनारको जानती थी, लेकिन बताया नहीं। बदले में पूछा, ''मास्साब, प्रधानमंत्री को मेरा नाम पता है?''

इस पर मास्साब की अकड़ कम हो गई और वह चकरा गए। फिर कहा, ''प्रधानमंत्री को और कोई काम नहीं कि तुम्हारा नाम याद करते फिरें - चलो बैठ जाओ।''

इधर अनारको सोचने लगी, प्रधानमंत्री भी कैसा आदमी होगा? सब लोग उसको जानते हैं और वह किसीको नहीं जानता! कैसा अकेला अकेला होगा प्रधानमंत्री!-----

मुलांच्या वागण्याकडे, त्यांच्या बोलण्याकडे कायम 'चूक की बरोबर'च्या चष्म्यातून पाहिले जाते. अपेक्षित चौकटीत न बसणाऱ्या त्यांच्या प्रश्नांना समजून न घेता उलट ते विचारल्याबद्दल मोठी माणसे वैतागतात, मुलांना घालूनपाडून बोलतात. हे प्रसंग वाचताना आपले वागणे अनारकोच्या शिक्षकांपेक्षा, आईपेक्षा काही वेगळे नाही हे जाणवून सुज्ञ वाचक खजील होतो.

२ - मास्टरसाब- गुरुजी

''आप चाहते क्या हो? मतलब जिंदगीसे?'' - या तिच्या प्रश्नाला मोठ्यांनी दिलेली 'दुकान खोलना चाहता हूँ,' 'नौकरी करना चाहता हूँ,' 'प्रमोशन चाहता हूँ' ही उत्तरे तिला अगदीच फालतू वाटतात. या प्रश्नावर 'अफ्रीका जाना चाहता हूँ' असे उत्तर कोणीच का देत नाही हे काही तिला कळत नाही.

अनारकोचे प्रश्न, तिची कल्पनाशक्ती खरे तर तिची तिच्या भोवतालचे जग समजून घेण्यासाठी केलेली खटपट आहे. मोठी माणसे त्यांच्या सोईप्रमाणे वागणे बदलतात, प्रामाणिकपणा दाखवत नाहीत याचा तिला सतत प्रत्यय येत असतो. अनारको मोठ्यांचे हे वागणे ग्राह्य न धरता तिच्या पद्धतीने त्या प्रश्नांना भिडते, तिच्या काल्पनिक दुनियेत त्यांची उत्तरे शोधते. पुस्तक वाचत असताना अनारकोचा सच्चेपणा आपल्याला ठायीठायी प्रत्ययाला येतो. पुस्तकाची भाषा अतिशय बाल-सुलभ आहे; पण बालिश नाही. जागांची आणि व्यक्तींची केलेली वर्णने, दिलेल्या उपमा वाचताना, मुलांच्या विश्वात डोकावून त्यांच्या विचारांमध्ये समरस होण्याचे लेखकाचे कसब आपल्याला अचंबित करते.

अनारकोचा मित्र गोलू, तिला भुतांबद्दल माहिती देत असतो.

गोलू ने बताया कि भूत हमेशा नंगे होते हैं। सिर्फ जब उन्हें किसीको डराना होता है तो सड़क के किनारे से उठाकर पहन लेते हैं। किंकु इसपर खूब हसने लगा था। लेकिन अनारको याद करने लगी थी कि आज उसने सड़क के किनारे पड़े कितने चीथड़े देखे थे। चीथड़ों को वह अब एक नयी नजर से देखने लगी थी।

आई जेव्हा बाबा होते आणि बाबा आई होतात...

''सामने से अम्मी चली आ रही हैं और पीछे-पीछे पिताजी भी। फिर अम्मी रुक गई तो पिताजी भी रुक गए। अम्मी घूरकर पापा को देखने लगीं। अरे यह क्या - अम्मी तो अम्मी थीं, पर देख ऐसे रही थीं पिताजी की तरफ जैसे पिताजी देख रहे हों। और पिताजी तो पिताजी थे, पर देख ऐसे रहे थे अम्मी की तरफ जैसे अम्मी हो। अब अनारको को नहीं मालूम, वह किसी को कैसे समझाए। पर उस देखने में ही ऐसा कुछ था कि अम्मी अम्मी होते हुए भी पापा लग रही थीं और पिताजी पिताजी होते हुए भी अम्मी लग रहे थे।''

पुस्तकाची ताकद त्याच्या निर्भीडपणात आहे; कुठेही जड, अलंकारिक किंवा धारदार भाषेचा वापर न करता वाचकाला अंतर्मुख करणाऱ्या आशयात आहे. पालकांनी, शिक्षकांनी आणि लहान मुलांबरोबर काम करणाऱ्या प्रत्येकाने वाचावे असे हे पुस्तक आहे.

'बचपन का इलाज किया जाए' हे वाक्य वाचकांना आयुष्यभर मनातून पुसता येणार नाही हे नक्की!

मानसी महाजन
manaseepm@gmail.com



लेखिका ५-१२ वयोगटाच्या मुलांसाठी वाचनकट्टे चालवतात तसेच अरविंद गुप्ता यांच्या 'Million Books for a Billion People' प्रकल्पांतर्गत वेगवेगळ्या भाषांमधील उत्तम बालसाहित्य मराठीत अनुवादित करून ते मुलांपर्यंत पोहोचवण्याचे काम करतात. त्या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील पदवीधर असून मुलांबरोबर समजून काम करता यावे यासाठी त्यांनी प्ले-थेरपीचे प्रशिक्षण घेतले आहे.

पालकनीतीची वर्गणी भरताना...
वार्षिक वर्गणी (₹ ३००)

ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचे तपशील खालीलप्रमाणे :
IDBI Bank, Palakneeti Parivar,
A/C No. : 50212010001718, Deccan Gymkhana Branch, Pune
IFSC code - IBKL0000502

इमेल : palakneeti@gmail.com • फेसबुक : https://www.facebook.com/palakneeti.masik
अंकातील लेख ऑनलाईन वाचण्यासाठी : palakneeti.wordpress.com या संकेतस्थळाला भेट द्या.
• www.palakneeti.in

Publication Date - 15.03.2021
Posting Date - 16.03.2021
Posted at BPC Vishrambagwada, Pune CSO, Pune - 411030

Registered

RNI No. MAHMAR/2001/4166
Postal Registered No.
PCW / 026 / 2021-2023

१ मार्च: शून्य भेदभाव दिवस

समाजात माणसांना निरनिराळ्या भेदभावांना सामोरे जावे लागते. वांशिक, धार्मिक, लैंगिकपासून ते अगदी कामाच्या ठिकाणच्या किंवा शाळेतल्या दादागिरीपर्यंत. प्रत्येकाला आपले आयुष्य सन्मानाने जगण्याचा अधिकार असला पाहिजे. वय, शैक्षणिक दर्जा, नोकरी-व्यवसाय, मनोधारणा, विविध प्रकारच्या अक्षमता किंवा व्याधी ह्यांचा त्यात अडसर येता कामा नये. HIV/ AIDS ने बाधित असलेल्या लोकांना समाजाकडून हेटाळणी वाट्याला येते. २०१३ च्या डिसेंबरमध्ये UNAIDS ने ह्या विरोधात जनजागृती घडवून आणण्यासाठी 'शून्य भेदभाव मोहीम' राबवली. हा विचार अधिक व्यापक करत 'संयुक्त राष्ट्रे' (UN) ने २०१४ साली १ मार्च हा दिवस 'शून्य भेदभाव दिवस' म्हणून जाहीर केला. कायद्यासमोर आणि व्यवहारात सगळे समान आहेत ह्या विचाराला बळकटी देण्याचा ह्यामागे उद्देश आहे.

८ मार्च: जागतिक महिला दिन

८ मार्च १९०८ साली १५ हजार महिलांनी न्यूयॉर्क शहराच्या रस्त्यावर मोर्चा काढून कामाचे तास कमी करण्याची मागणी केली होती. त्याशिवाय चांगले वेतन आणि मतदानाचा अधिकार मिळावा अशाही त्यांच्या मागण्या होत्या. या आंदोलनाच्या वर्षभरानंतर अमेरिकेतल्या सोशालिस्ट पक्षाने ८ मार्च हा पहिला राष्ट्रीय महिला दिवस म्हणून घोषित केला. पुढे क्लारा जेटकीन या कम्युनिस्ट कार्यकर्तीने १९१० साली कोपनहेगनमध्ये झालेल्या काम करणाऱ्या महिलांसाठीच्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेत 'जागतिक महिला दिन' साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. त्या परिषदेत १७ देशांच्या १०० महिला सहभागी झाल्या होत्या. सर्वांनीच प्रस्तावाला अनुमोदन दिले.

भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस १९४३ साली साजरा झाला. प्रत्येक महिलेला आत्मभान देणारा दिवस असे ह्या दिवसाबद्दल म्हणता येईल. स्त्रियांनी आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात घेतलेली झेप साजरी करणे हा ह्या दिवसाचा उद्देश आहे.

१४ मार्च: एक पाऊल नदीसाठी

नदीची बांध-बंदिस्ती, तिचे पाणी अडवून बांधलेली धरणे, स्वतःच्या सोयीनुसार बदललेले तिचे मार्ग, आणि हीच विकासाची व्याख्या. ह्या सगळ्याचे विनाशकारी परिणाम वारंवार पुढे येत असतानाही नवनव्या प्रकल्पांची आखणीही तेवढ्याच जोमाने सुरू असते.

१९९७ साली मार्च महिन्यात धरणामुळे विस्थापित झालेल्या २० देशांतील लोकांची एक बैठक ब्राझिलमध्ये झाली. त्यात स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर धरणे बांधण्याला विरोध करण्याचे ठरवण्यात आले. नद्यांचे आपल्या आयुष्यातले महत्त्व आणि हवामानबदल ह्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी तेव्हापासून दरवर्षी १४ मार्चला 'नदीसाठी कृतिदिन' जागतिक स्तरावर साजरा करण्यात येतो. स्वच्छ आणि पुरेसे पाणी मिळणे हा जसा आपला अधिकार आहे, तसेच नैसर्गिक उर्मीनुसार वाहता येणे हा नदीचा मूलभूत अधिकारच आहे, हे लक्षात घेत २०२१ सालच्या कृतिदिनाचा विषय 'नद्यांचे अधिकार' असा आहे.

२० मार्च: आंतरराष्ट्रीय प्रसन्नता दिवस

माणसाचा सगळा अट्टहास, आटापिटा हा सुख, आनंद मिळवण्यासाठी चाललेला असतो. सकल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षाही सकल राष्ट्रीय आनंद महत्त्वाचा हे अधोरेखित करण्यासाठी २०१३ सालापासून २० मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय प्रसन्नता दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो.

२०२० सालच्या UN च्या १५६ देशांच्या आनंदी देशांच्या यादीत भारताचा क्रमांक १४० पर्यंत घसरला आहे. भारतीय लोक किती तणावग्रस्त आहेत, ह्याचेच हे द्योतक आहे. ह्या यादीत फिनलंडसारखा लहानसा देश आपले प्रथम स्थान राखून आहे.

२२ मार्च: जागतिक जल दिन

सजीवांच्या आयुष्यातील पाण्याचे महत्त्व नव्याने सांगण्याची गरज नाही. परंतु, पाण्याचा होत असलेला अविचारी वापर पाहता आणि पिण्यायोग्य पाण्याचे निसर्गातील प्रमाण अगदीच मोजके असल्याने, त्याच्या स्रोतांची जपणूक करणे गरजेचे आहे.

UN च्या सर्वसाधारण सभेने २२ मार्च १९९३ रोजी पहिला 'वर्ल्ड वॉटर डे' साजरा केला. तेव्हापासून दरवर्षी UN च्या जागतिक जलविकास अहवालाशी सुसंगत संकल्पना घेऊन 'जागतिक जल दिन' साजरा केला जातो.